जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-28/2020
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 23.10.2020

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दिनांक 26.10.2020 रोजी सकाळी 11.30** वाजता **ONLINE व्दारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( तेहरा अमितसिंह गोपालसिंह )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती ------------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आवि/औभां/4333/2020 दिनांक 14.08.2020 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना संशयीत रुग्णांच्या घश्यातील स्त्रावाची तपासणी करण्या करिता तथा उपायायेजना म्हणून Viral Transport Medium (V.T.M) Kit ची खरेदी करणे आवश्यक असल्याने या कामी निविदा प्रक्रिया राबविणे करितीा वेळ लागु शकतो सबब उपरोक्त नमुद एका शासकीय यंत्रणाने खरेदी केलेल्या दराप्रमाणे स्थानिक बाजार पेठेमध्ये विचारपुस केली असता मे. युनीव्हर्सल ट्रेडर्स नांदेड यांनी रुपये 116/- प्रति नगर प्रमाणे पुरवठा करण्यास समंती दिल्यामुळे संबंधीतांकडून 2000 नगर खरेदीपोटी एकूण रुपये 3,32,000/- इतका खर्च अपेक्षीत असल्याने सदर खर्च महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 67(3) (क) नुसार आयुक्तांने कोणत्याही आणिबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षेसाठी किंवा महापालिकेच्या संरक्षणासाठी आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये त्यास समर्थनिय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या ऐखादया नगरपालिका प्रधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्राधिकरणाशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे.

परंतु आयुक्तांनी त्यांने केलेली कार्यवाही त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये चालु अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ठ नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमकुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविले पाहिजे अशी तरतुद असल्याने संबंधीत पुरवठा धारकाकडून कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आवि/औभां/4334/20 दिनांक 14.08.2020 अन्वये सदरचे मशीनच्या मशीनी खरेदी करण्यात आली **त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 02**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आवि/औभां/4335/20 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकानांदेड कार्यक्षेत्रात Covid-19 अनुषांगिक उपायोजना म्हणून Personal Protective Equipment (P.P.E) Kit without N-95 Mask च्या 3000 नगर खरेदी करण्यासाठी मा. जिल्हा शल्यचिकित्सक शल्यचिकित्सक कार्यालय नांदेड यांच्या तर्फे ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असता मे. सॅफ्रॉन टेक्नोसोल्युशन प्रा.ली. सुरत गुजरात या निविदाधारकासोबत दर निश्यिचती झाली असुन सदर दर निश्चितीचे पत्र क्रं. E-Tender No. 2020-Nanded-583200 तोव कीरी न) क्रं CSN/MS/Covid19/&PPPE Kit)/Tender Acceptance Letter/10849/20-21 Date 23.07.2020 ची प्रत मुळसंचिकेच्या मागिल बाजुन जोडण्यात आहेॠ ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दर प्रति नग | पुरवठा धारकाचे नांव |
|---|---|---|---|
| 01 | Personal Protective Equipment (PPE) Kit without N-95 Mask Each PPE Kit Contain:<br>Cover All-01<br>Shoe Cover-02<br>Surgical Mask 03 ply-01<br>Gloves-01 pair<br>Goggle 01<br>Dispo. Waste Nag-01 | 367.50 | M/s. Saffron Technosolution Pvt. Ltd. Surat (Gujarat) |

उक्त तकत्यातील मंजुर दराप्रमाणे संबंधीत पुरवठाधारकाकडून जिल्हा शल्चचिकित्सक नांदेड यांनी Personal Protective Equipment (PPE) Kit without N-95 Mask खरेदी केली आहे.

कोरोना रोगाच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांच्या तपासणीसाठी सदर खरेदी तात्काळ करणे आवश्यक आहे या कामी निविदा प्रक्रिया राबवणे करिता वेळ लागु शकतो सबब उपरोक्त नमुद एकाच शासकीय यंत्रणाने खरेदी केलेल्या दरामध्ये व उपलब्ध असलेल्या पुरवठा धारकाकडून खरेदीस मान्यता प्रदान करणे योग्य या खरेदीपोटी एकूण रुपये 11,02,500/- इतक खर्च अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 67(3) (क) नुसार आयुक्तांने कोणत्याही आणिबाणीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षेसाठी किंवा महापालिकेच्या संरक्षणासाठी आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये त्यास समर्थनिय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या ऐखादया नगरपालिका प्रधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी मान्यता किंवा प्राधिकरणाशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे.

परंतु आयुक्तांनी त्यांने केलेली कार्यवाही त्याबाबतची कारणे आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये चालु अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ठ नसलेला जो कोणताही खर्च अशा कार्यवाहीमकुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविले पाहिजे अशी तरतुद आहे. करिता Personal Protective Equipment (P.P.E) Kit without N-95 Mask च्या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता उक्त आदेशान्वये देण्यात आलेली असुन **त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 03**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/पापुवजनि/6099/2020 दिनांक 24.09.2020 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी पावरपंप देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यासाठी उप अभियंता यांनी सादर केलेले अंदाजपत्रक दिनांक 29.07.20 नुसार सदरच्या कामावर झालेला खर्च रुपये 22,82,996/- (अक्षरी रुपये बावीस लक्ष बियांशी हजार नऊशे छयान्वे फक्त) सादर केलेले असुन यास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आलेली असुन सदरील आदेशी नोंद घेणे बाबत.**

या कामी होणारा खर्च महानगरपालिका अंदाजपत्रक सालसन 2020-21 च्या मनपा अर्थसंकल्पातुन पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षातुन करण्यात येते.

**विषय क्रं. 04**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/पापुवजनि/6847/2020 दिनांक 15.10.2020 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत पाणी पुरवठा विभागा अंतर्गत सर्व WTP व WPS येथील ट्रान्सफार्मरची दुरुस्ती करणे या कामासाठी दर पत्रक मंजुरी आदेश क्रं. 7454/2019 दिनांक 21.09.2019 अन्वये सर्वात कमी दराचे दर पत्रक कंत्राटदार उझेर इंटरप्रायजेस नांदेड यांचे असुन निविदा दर मंजुर करण्यात आले आहेत. कार्यारंभ आदेश क्रं. 7455/2019 दिनांक 21.09.2019 अन्वये सदर कंत्राटदारास पुढील तीन वर्षा करिता कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे त्या अनुषंगाने सदर कंत्राटदाराने नावाशमनपाकेच्या सर्व WTP व WPS येथील ट्रान्सफार्मरची दुरुस्ती केलेली असुन त्याचा खर्च रुपये 11,14,640/- (अक्षरी रुपये अकरा लक्ष चौदा हजार सहाशे चाळीस फक्त) चे देयके अदाईसाठी उप अभियंता विधुत यांनी सादर केलेले आहे **खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) अन्वये देण्यात आलेली असुन सदरील आदेशची नोंद घेणे बाबत.**

या कामी होणारा खर्च महानगरपालिका अंदाजपत्रक सालसन 2020-21 चे आर्थीक तरतुदीतील पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन करण्यात येते.

**विषय क्रं. 05**

नांदेड वाघाळा शहरा महानगरपालिकेच्या श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम परिसरात एक्सप्रेस फिडर बसविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती नांदेड यांचे आदेश क्रं. नियोजन/जीवायो/निवि/का-1/2012-13/3926 नुसार रुपये 30 लक्षात प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच सदर निधी रुपये 30 लक्ष हे महापालिकेस प्राप्त झाला आहे. तथापी प्राप्त निधीतुन सदरचे काम पुर्ण होत नसल्याने या कामा ऐवजी कै. शांतीराम सगणे जलतरणीकेत 350 HP च्या नविन सेंन्ट्रीफयुगल पंप बसविणे आवश्यक असल्याने फेर प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन अधिकारी नांदेड यांच्याकडे सादा करण्यात आलेला आहे त्यास अद्याप मान्यता प्रापत झाली नाही.

कै. शांताराम सगणे जलतरणीका हे मनपाकेचे स्त्रोत असुन सदरचे काम करणे आवश्यक असल्यामुळे सदर काम मनपा निधीतुन प्रस्तावीत करण्यात येईल या अटीवर सदर कामास प्रशासकिय आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायील समिती सभे समोर मंजुरीकरीता सादर.

**विषय क्रं. 06**

विषय :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्रभाग क्रं. 07 मध्ये जयभीमनगर भागात मोकळया जागेत 10 सिटचे सामुदायिक शौचालय बांधकाम करणे बाबत

संदर्भ :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता आदेश क्रं. स्वमअ/255/18 दिनांक 07.04.2018

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत नांदेड शहर हद्दीत प्रभाग क्रं. 07 मध्ये जयभीमनगर भागात मोकळया जागेत 10 सिटीचे सामुदायीक शौचालयाचे बांधकाम करणेसाठीचे रुपये 7,05,305/- च्या कामाचे प्रशासकिय व आर्थीक मान्यता उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये प्राप्त झाल्या प्रमाणे सदरील कामाची ई-निविदा प्रक्रिया हाती घेवुन कंत्राटदार मे. स्वास्तीक कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करुन कार्यालयीन आदेश क्रं. स्वमअ/2284/18 दिनांक 22.05.2018 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

सदर सामुदायीक शौचालयाचे काम अंतिम टप्प्यात असतांना QCI समितीने नांदेड शहरात भेट दिली असतांना ODF ++ दर्जा प्राप्त करण्यासाठी तसेच गुण प्राप्त करण्यासाठी त्यांनी सामदुयीक / सार्वजनिक शौचालयांना केअर टेकर रुम आवश्यक असते अश्या सुचना दिल्या त्या अनुषंगाने जयभीमनगर येथे बांधण्यात येत असलेल्या शौचालयालगत केअर टेकर रुम बांधुन घेण्यासाठी तसेच ODF ++ दर्जा प्राप्तीसाठी सदरील बाब आवश्यक असल्याचे सुचना दिल्या. त्याअनुषंगाने सदरील काम होती घेण्यात आले सदरील कामावर GST सह रुपये 2,48,585/- एवढा जास्तीचा खर्च झालेला आहे.

करिता सदरील कामाची मंजुर किमंत रुपये 7,05,305/- + वाढीव खर्च रुपये 2,48,585/- महानपगरपालिकेच्या सालसन 2020-21 च्या अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्याची सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करुन वाढीव काम रुपये 2,48,585/- यास मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या सेवेत सादर.

**विषय क्रं. 07**

विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत लेबर कॉलनी भागात अग्निशमन विभागाच्या इमारतीचे फेस-2 बांधकाम करणे रुपये 3,27,00,000/-

संदर्भ :- प्रशासकिय व आ.मं. आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/4695/2020 दिनांक 21.08.2020

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत लेबर कॉलनी भागात अग्निशमन विभागाच्या इमारतीचे फेस-2 बांधकाम करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार रुपये 3,27,00,000/- करिता निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि /4933/2020 दिनांक 28.08.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक गोदातीर नांदेड:दैनिक नवभारत टाईम्स (नवभारत प्रेस लि) (राज्य) या वर्तमान पत्रातुन दिनांक 31.08.2020 ई-निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 13.10.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | अंदाजपत्रकिय दर |
| 02 | साई कन्सट्रक्शन नांदेड | 21.20% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असुन जी अंदाजपत्रकिय दराची आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत लेबर कॉलनी भागात अग्निशमन विभागाच्या इमारतीचे फेस-2 बांधकाम करणेसाठी मे. स्वान इन्फ्रास्ट्रारक्चर नांदेड यांची अंदाजपत्रकिय दराने संविदा करणेकामी रुपये 3,27,00,000/- GST सह मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 08**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत पक्कीचाळ पोलीस चौकी ते गंगाचाळ ते चुनाल नाका ते स्मशानभुमि ते विपश्यानकेंद्र, भिमघाट बौध्द विहार समोर आर.सी.सी. रोड करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 4,21,72,500/-)

नावाशमनपा हद्दीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पक्कीचाळ पोलीस चौकी ते गंगाचाळ ते चुनाल नाला ते स्मशानभुमी ते विपश्याना केंद्र, भिमघाट बौध्द विहार समोर आर.सी.सी रोड बांधणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 3,76,93,366/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/ 1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय)/दैनिक नवभात

टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 18.06.2020 अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 27.08.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. गणेश इंटरप्रायझेस नांदेड | 30.00% जास्त दर |
| 02 | शारदा कनसट्रक्शन अन्ड कार्पो. प्रा.लि. नांदेड | 50.00% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. गणेश इंटरप्रायजेस नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.00% जास्त दरा ऐवजी 7.60% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.01% कमी येत आहेत.

करिता मे. गणेश इंटरप्रायजेस नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.61% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 09**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत लालवाडी अंडर ब्रिज येथील दोन्ही बाजुने रस्ता करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 31,10,300/-)

नावाशमनपा हद्यीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत लालवाडी अंडर ब्रिज येथील दोन्ही बाजुने रस्ते विकसीत करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 27,79,986/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय)/दैनिक नवभात टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 18.06.2020 अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 10.09.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 29.00% जास्त दर |
| 02 | गुरु रामदास कन्स्ट्रक्शन | 30.00% जास्त दर |
| 03 | मे. शंकर कन्सट्रक्शन नांदेड | 35.51% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा अबचलनगर इनफ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.00% जास्त दरा ऐवजी 7.50% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.0138% कमी येत आहेत.

करिता अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 10**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत आंबेडकर नगर पाण्याची टाकी जे गणशनगर मुख्य रस्त्याला जाणारा रस्ता आर.सी.सी. करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 95,79,500/-)

नावाशमनपा हद्यीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत आंबेडकर नगर पाण्याची टाकी ते गणेशनगर मुख्य रस्त्याला जोडणारा रस्ता आर.सी.सी. संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 6,62,98,382/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/ 1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय)/दैनिक नवभात टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 27.08.2020 अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द

केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 27.08.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. अजय कन्सट्रक्शन नांदेड | 30.00% जास्त दर |
| 02 | शारदा कन्सट्रक्शन अन्ड कार्पो. प्रा.लि. नांदेड | 50.00% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. अजय कन्सट्रक्शन नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.00% जास्त दरा ऐवजी 7.85% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.023% कमी येत आहेत.

करिता मे. अजय कन्सट्रक्शन नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.85% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 11**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पंचशील ड्रेसेस ते तरोडा नाका पर्यंत आर.सी.सी. रस्ता व नाली करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 4,57,66,200/-)

नावाशमनपा हद्यीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पंचशील ड्रेसेस ते तरोडा नाका पर्यंत आर.सी.सी रस्ता व नाली करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 4,08,95,372/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/ 1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय)/दैनिक नवभात टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 18.06.2020 अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 31.08.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. शंकर कन्सट्रक्शन नांदेड | 29.51% जास्त दर |
| 02 | गुरु रामदास कन्सट्रक्शन नांदेड | 33.00% जास्त दर |
| 03 | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 35.00% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. शंकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.51% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.51% जास्त दरा ऐवजी 9.20% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.03% कमी येत आहेत.

करिता मे. शंकर कन्सट्रक्शन नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.20% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 12**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत आंबेडकर नगर कौर्नर ते जयभिमनगर ते नागसेननगर ते राजनगरख मनपा हद्य तसेच पुष्पनगर, काबरानगर मुख्य रस्ताला जोडणारा रस्ता व नाली करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 7,41,76,800/-)

नावाशमनपा हद्यीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत आंबेडकर नगर कॉनर्र ते जयभिमनगर ते नागसेननगर ते राजनगर, मनपा हद्य तसेच पुष्पनगर, काबरानगर मुख्य रस्ताला जोडझारा रस्ता व नाली करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 6,62,98,382/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय) /दैनिक नवभात टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 18.06.2020

अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 27.08.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. गणेश इंटरप्रायजेस नांदेड | 30.00% जास्त दर |
| 02 | शारदा कन्सट्रक्शन नांदेड | 50.00% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा गणेश इंटरप्रायजेस नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.00% जास्त दरा ऐवजी 8.00% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.01% कमी येत आहेत.

करिता मे. गणेश इंटरप्रायजेस नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.00% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 13**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत आंबेडकर प्रभाग क्रं. 14 मध्ये सिध्दाथनगर, लक्ष्मीनगर, पंचशीलनगर (ब्रम्हपुरी) बॉक्स कल्व्हर्ट व रिटनिंग वॉल करणे व रस्ता/पाथवे तयार करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 2,40,00,000/-)

नावाशमनपा हद्दीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं. 14 मध्ये सिध्दार्थनगर, लक्ष्मीनगर, पंचशीलनगर (ब्रम्हपुरी) बॉक्स कल्व्हर्ट व रिटनिंग वॉल करणे व रस्ता/पाथवे तयार करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 2,14,28,502/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय) /दैनिक नवभात टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 18.06.2020 अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 01.09.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 29.00% जास्त दर |
| 02 | गुरु रामदास कन्सट्रकशन नांदेड | 30.00% जास्त दर |
| 03 | मे. शंकर कन्सट्रक्शन नांदेड | 35.38% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.00% जास्त दरा ऐवजी 15.40% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.02% कमी येत आहेत.

करिता अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.40% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 14**

**विषय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत रमामाता हौसिंग सोसायटी ते महात्मा फुले मार्केट पर्यंत आर.सी.सी. रस्ता व नाली करणे

**संदर्भ** :- प्रशासकिय मान्यता क्रं. 2020/नपाप्र/टे-6/स.लो.अ.भा.सा.ना.व/मनपा/सिआर-15 दिनांक 22.05.2020 (रुपये 3,28,51,150/-)

नावाशमनपा हद्दीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत रमामाता हौसिंग सोसायटी ते महात्मा फुले मार्केट पर्यंत आर.सी.सी. रस्ता व नाली करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 2,93,57,722/- करिता ई.निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/1762/2020 दिनांक 16.06.2020 अन्वये दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय/दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय) /दैनिक नवभात टाईम्स हिंदी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत नांदेड / दैनिक हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 18.06.2020 अन्वये इ-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 31.08.2020 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 29.00% जास्त दर |
| 02 | गुरु रामदास कन्सट्रकशन नांदेड | 30.00% जास्त दर |
| 03 | मे. शंकर कन्सट्रक्शन नांदेड | 35.33% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असून जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.00% जास्त दरा ऐवजी 9.30% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली आहे जे की प्रचलित जिल्हा दरसुची 2020-21 नुसार दर हे 0.05% कमी येत आहेत.

करिता अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.30% जास्त दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर काम या कामासाठीच्या मंजुर रक्कमेतुनच करण्याच्या मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 15** **अपिल** **दिनांक 25.01.2020 प्राप्त दि. 21.08.20**

**प्रति,**

**मा. सभापती,**

स्थायी समिती,

नावाशमनपा नांदेड

**विषय** :- किरकोळ स्वरुपाची शास्ती लावून सेवेत रुजु करुन घेणे बाबत

**महोदय,**

वरील विषयी मी अर्जदार श्री बालाजी देवराव देसाई महानगरपालिकेत दिनांक 18.06.2011 पासुन स्वच्छता निरीक्षक या पदावर वेतनश्रेणीत कार्यरत आहे.

आ. महोदय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने स्वतंत्र सेवा प्रवेश तयार केले नसल्याने मी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(4) नुसार सविनयपपुर्वक खालीलप्रमाणे अपिल सादर करीत आहे.

आ. महोदय, माझ्याकडून क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 शिवाजीनगर अंतर्गत डॉ. राजेंद्र पुंजाराव कदम, सहयाद्री हॉस्पीटल, तुप्तेवार अक्सीडेंट अँड मेटर्निटी हास्पीटल व राधिका हॉस्पीटल अन्ड नर्सिंग होम यांचेकडून युजर चार्जेस पोटी वसुल केलेली रक्कमेचा वापर करुन विलंबाने मनपा बँक खात्यात जमा करुन तात्पुरता अपहार केल्यामुळे तसेच युजर चार्जेस पोटी पावती पुस्तकाव्दारे वसुल केलेली रक्कम व मनपा निधीमध्ये जमा केलेली रक्कम यामध्ये तफावत करुन कार्यालयाची दिशाभुल रुपये 12600 चा तात्पुरता अपहार केल्याचा माझ्यावर दोषारोप ठेवुन मला महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 चे कलम 8 (1) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही आदेशित करुन मला महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 चे कलम 4 पोट कलम 01 अन्वये कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/5237/2019 दिनांक 21 ऑगस्ट 2019 रोजी निलंबीत करण्यात आले आहे.

तसेच या प्रकरणात कायार्सलयाने माझ्या विरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन नांदेड येथे गुन्हा क्रं. 345/19 अन्वये दाखल केला आहे या प्रकरणी मी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अटकपुर्व जामीनासाठी दिलेला अर्ज क्रं. 1505/19 मध्ये दिनांक 03.12.19 रोजी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपहारीत रक्कम रुपये 12600/- आदेश झाल्याच्या तारखे पासुन 03 दिवसाच्यात आत कार्यालयात भरणा करण्याचे आदेश झाले होते त्यानुसार सदरची रक्कम भरणा करुन घ्यावी म्हणुन सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 यांना दिनांक 05.12.19 रोजी विनंती अर्ज सादर केला होता परंतु त्यांनी त्यावर विचार केला नसल्याने मी दिनांक 06.12.19 रोजी मा. आयुक्त यांच्या नावे रुपये 12600/- चा धनादेश जोडुन भरणा करुन घेण्याची विनंती केली होती.

परंतु माझ्या वरील दोन्ही अर्ज विचार न झ्ढाल्याने व मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे दिनांक 03.12.19 रोजी झालेल्या आदेशामध्ये सदर रक्कम तिन दिवसाच्या आत भरण्याचे आदेश असल्यामुळे मी दिनांक 07.12.19 रोजी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा चुडावा येथील माझ्या नावे असलेल्या खात्यातुन उपआयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या नावे RTGS व्दारे रुपये 12600/- भरणा केला आहे व त्याबाबतचा अहवाल लेखी स्वरुपात क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 यांना लेखी स्वरुपात कळविले आहे.

माझ्या निलंबनाचा कालावधी 159 दिवस म्हणजेच पाच महिने 09 दिवस इतर होत आहे या कालावधीत मला माझ्या निलंबनाच्या चौकशीपोटी कार्यालयाकडून ज्ञापन किंवा जोंडपत्र 01 ते 04 देण्यात आलेले नाही.

निलंबित शासकिय सेवाकाचा आढावा घेण्याबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. निप्रआ-1111/प्र.क्र.86/11अ दिनांक 14.10.11 च्या शासन निर्णयतील परिच्छेद क्रं. 7-अ मध्ये ज्या शासकिय अधिकारी कर्मचारी यांना बेहिशोबी मालमत्ता, नैतिक अध:पतन लाच-लुचपत, खुन, खुनाचा प्रयत्न, बलत्कार या कारणासाठी निलंबित करण्यात आले असेल

असे कर्मचारी वगळुन केवळ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 च्या नियम 8 अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित किंवा सुरु असल्याचे कारणाने निलंबित करण्यात आले असेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत निलंबनाच्या तारखे पासुन 03 महिण्याच्या आत आढावा घ्यावा व सेवेत पुन:स्थापित करावे अशी तरतुद आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) 1979 निलंबित शासकिय सेवाकांना 90 दिवसाच्या कालावधीत दोषारोप पत्र बजावणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. निप्रआ-1118/प्र.क्र.11/11अ दिनांक 09.07.19 रोजीच्या शासन निर्णयात निलंबित कर्मचा-यांच्या बाबतीत 90 दिवसाच्या आत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 16.02.15 रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन सदरील शासन निर्णयाव्दारे निलंबन प्रकरणी निलंबित केल्याच्या तारखेपासुन 90 दिवसाच्या आत जोडपत्र देणे बंधनकारक केले आहे.

आ. महोदय कार्यालयाने मला निलंबित करुन निलंबनाच्या तारखेपासुन 05 महिने 09 दिवस एवढा कालावधी उलटुन गेल्यानंतरही दोषारोप पत्र बजावलेले नाही.

आ. महोदय, माझ्या नियुक्ती झाल्यापासुनच्या कालावधी पासुन ही माझ्याकडून माझ्या दैनंदिन कामाच्या व्यापामुळे अनावधानाने पहिलीच चुक झाली असुन मी अपहारीत रक्कम कार्यालयात भरणादेखील केलेली आहे. त्यामुळे मी माझ्याकडुन झालेली चुक कबुल करत असुन भविष्यात अशी चुक होणार नाही याची मी दक्षता घेऊन त्यामुळे माझ्या अपिलावर सहानुभूतीपुर्वक विचार करुन किरकोळ स्वरुपाची शास्ती लावुन सेवेत रुजु करुन घ्यावे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 481 मधील तरतुदीनुसार माझ्या विरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा मागे घेण्याची मान्यता द्यावी अशी सविनय नम्र विनंती करतो.

**आपला,**

**स्वाक्षरीत/-**

**बालाजी देवराव देसाई, स्वच्छता निरीक्षक**

**प्रशासकिय टिप्पणी**

क्षेत्रीय अधिकारी क्षे.का.क्रं. 03 (शिवाजीनगर) मनपा नांदेड यांनी दिनांक 09.08.19 रोजी कार्यालयात अहवाल सादर करुन क्षेत्रीय कार्यालय क्रं 03 अंतर्गत प्रभाग क्रं. 08 मध्ये स्वच्छता निरीक्षक म्हणुन कार्यरत असलेले श्री बालाजी देवराव देसाई स्वच्छता निरीक्षक यांनी काम पाहत असतांना व्यवसाय परवाना देणे व युजर चार्जेस भरुन घेणे इत्यादी या अंतर्गत संचिका क्रं. क्षेकाक्रं.03/2019-20 (1) डॉ. राजेंद्र पुंजाराव कदम, सहयादी हॉस्पीटल शिवाजीनगर नांदेड (2) तुसेवार अक्सीडेंट अन्ड मॅटर्निटी हॉस्पीटल, शिवाजीनगर नांदेड यांच्या संचिका व त्यासंबंधीताचे वसुल केलेले युजर चार्जेसचे पावती पुस्तक यामध्ये (1) सहयाद्री हॉस्पीटल डॉ. राजेंद्र पुजाराव कदम यांचेकडुन युजर चार्जेस दिनांक 01.04.17 ते 31.03.20 पर्यंत रुपये 16200 पावती क्रं. 05/99 दिनांक 30.04.19 रोजी भरणा केल्याचे नमुद केले आहे परंतु पावती पुस्तक तपासले असता रुपये 10800/- ची पावती फाडलेली आहे.

2) तुसेवार अक्सीडेंट अन्ड मॅटर्निटी हॉस्पीटल शिवाजीनगर नांदेड यांचेकडुन युजर चार्जेस दिनांक 01.04.2019 ते 31.03.20 पर्यंत 7200/- पावती क्रं. 02/99 अन्वये दिनांक 30.04.19 रोजी भरणा केल्याचे नपमुद केले आहे परंतु प्रत्यक्षात पावती रुपये 5400/- ची पावती फाडल्याचे निर्दशनास आले आहे.

3) राधिका हॉस्पीटल अन्ड नर्सिंग होम यांचेकडुन युजर चार्जेस दिनांक 01.04.18 ते 31.03.21 पय्रंत रुपये 16200/- पावती क्रं. 90/66 अन्वये दिनांक 19.02.19 रोजी भरणा केल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रत्यक्षात बुक क्रं. 66 पावती क्रं. 90 तपासले असता रुपये 10800/- वसुल केल्याचे दिसुन येत असल्याचे अहवालात नमुद केले आहे

वरील तिन्ही संचिका व पावत्या पाहता यात अपहार झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येत असल्यामुळे त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करुनप त्यांनी दिलेल्या परवान्याबाबत सखोल चौकशी व लेखा परिक्षण करणे बाबत क्षेत्रीय अधिकारी क्षे.का.क्रं. 01 यांनी अहवाल सादर केला असुन अहवालाच्या अनुषंगाने संबंधहीत श्री बालाजी देवराव देसाई स्वच्छता निरीक्षक यांना का.आ. क्रं. नावाशमनपा(साप्रवि/आस्था-3/5237/2019 दिनांक 21.08.19 अन्वये निलंबित करण्यात आले तसेच क्षेत्रीय अधिकारी क्षेत्रीय कार्यालय क्रं 03 यांना संबंधीताविरुध्द दोषारोप जोडपत्र 01 ते 04 तयार करुन आस्थापना विभागास सादर करावे असे आदेशीत केले होते.

क्षेत्रीय अधिकारी क्षेत्रीय कार्यालय क्रं 03 (शिवाजीनगर) मनपा नांदेड यांनी कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/क्षेकाक्रं.03 /7096/20 दिनांक 28.02.20 अन्वये संबंधीताविरुध्द जोडपत्र 01 ते 04 सादर केले आहे क्षेत्रीय अधिकारी क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 (शिवाजीनगर) मनपा नांदेड यांनी सदर प्रकरणात संबंधीतांविरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशनप नांदेड येथे गुन्हा क्रं. 345/19 अन्वये दाखल केला आहे या प्रकराणी संबंधीतांचे मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अक्पुर्व जामीनासाठी दिलेला अर्ज क्रं. 1505/19 मध्ये दिनांक 03.12.19 रोजी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपहारित रक्कम रुपये 12600/- आदेश झाल्याच्या तारखे पासुन 03 दिवसाच्या आत कार्यलयात भरणा करण्याचे आदेश झाले होते. त्यानुसार सदरची रक्कम संबंधीतांनी दिनांक 07.12.19 रोजी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा चुडावा येथून त्यांचे नावे असलेल्या खात्यातुन उपआयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या नांवे RTGS व्दारे रुपये 12600/- भरणा केला आहे व त्याबाबतचा लेखी अहवाल क्षेत्रीय अधिकारी क्षे.का.क्रं. 03 यांचेकडे सादर केल्याचे दिनांक 28.01.20 च्या अर्जामध्ये नमुद केले आहे.

क्षेत्रीय अधिकारी क्षेत्रीय कार्यालय क्रं 03 (शिवाजीनगर) मनपा नंादेड यांनी कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/क्षे.का. .03/7096/20 दिनांक 28.02.20 अन्वये संबंधीतांविरुध्द जोडपत्र 01 ते 04 सादर केले आहे. त्यानुसार संबंधीतांविरुध्द कार्यालयीन ज्ञापन क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/14349/20 दिनांक 06.03.20 अन्वये ज्ञापन व जोडपत्र 01 ते 04 बजावण्यतायेवुन खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने संबंधीतानी दिनांक 11.03.20 रोजी खुलासा सादर करुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप मान्य नसल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे संबंधीतांविरुध्द कार्यालयीन ओदश क्रं नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/12/20 दिनांक 01.04.20 अन्वये विभागीय चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी दिनांक 08.07.20 रोजी पत्र देवुन संबंधीताविरुध्द चौकशी चालु असल्याचा अहवाल सादर केला आहे.

संबंधीतांच्या निलंबन प्रकरणी विधी अधिकारी मनपा नांदेड यांनी संबंधीतांने महानगरपालिकेच्या पैश्यांचा आर्थीक अपहार केल्यामुळे संबंधीतांविरुध्द एफ.आय.आर. क्रं. 345 भा.द.वि. कलम 409 खाली दाखल असल्याचे निदर्शनास येते. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. शासन निर्णय दिनांक 14.10.11 मधील परिच्छेद क्रं. 03 नुसार ज्या प्रकरणी शासकीय अधिकारी कर्मचा-यांवर बेहिशेबी मालमत्ता, नैतिक अध:पतन, लाच-लुचपत, खुन, खुनाचा प्रयत्न, बलत्कार या व या सारख्या गंभीर प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल असल्यामुळे निलंबनाची कारवाई करण्यात आली असेल अशा प्रकरणी निलंबनाच्या दिनांकापासुन एक वर्षानंतर प्रकरण संबंधीत निलंबन आढावा समितीसमोर विचारार्थ सादर करण्यात यावा असे कायदेशीर अभिप्राय दिला आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 481 मधील तरतुदीनुसार त्यांचा विरुध्द दाखल झालेला गुन्हा मागे घेता येत नाही. तसेच संबंधीतांचे निलंबन होवुन एक वर्ष झाले असल्यामुळे शासन निर्णय दिनांक 14.10.11 मधील तरतुदीनुसार प्रकरणी निलंबन आढावा समितीसमोर प्रकरण ठेवुन निपलंबन आढावा समितीने दिलेल्या निर्णयानुसार योग्यती कार्यवाही करण्यात येईल.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( तेहरा अमितसिंह गोपालसिंह )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.